# जलसंधारण विभागांतर्गत असलेल्या योजना

जलसंधारण विभागा अंतर्गत मुख्यत्वे योजना खालील प्रमाणे आहेत.

## अ) जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधरण व आदिवासी उपयोजना)

**लेखाशीर्ष**

१) **लपा योजनेची कामे :-** या योजने अंतर्गत ० ते १०० हे.अंतर्गत तलावांची निर्मिती व दुरुस्तीची कामे केल्या जाते.तसेच सिमेंट बंधारे,काम्पोजीट ग्याबियन बंधाऱ्याचे बांधकाम व दुरुस्ती केल्या जाते.

२) **को.प.बं.योजना :-** या योजने अंतर्गत ० ते १०० हे.अंतर्गत को.प.बंधाऱ्याची निर्मिती व दुरुस्तीची कामे केल्या जाते.तसेच सिमेंट बंधारे,काम्पोजीट ग्याबियन बंधाऱ्याचे बांधकाम व दुरुस्ती केल्या जाते.

**ब) जिल्हा परिषद उपकार (स्वनिधी) :-** या योजने अंतर्गत ० ते १०० हे.अंतर्गत ल.पा.तलावांची /को.प.बंधाऱ्याची देखभाल दुरुस्ती परिरक्षण व गाळ काढनेची ची कामे केल्या जाते.तसेच सिमेंट बंधारे,काम्पोजीट ग्याबियन बंधाऱ्याचे दुरुस्ती केल्या जाते.

## क) शासन स्तरावरील निधीच्या माध्यमातून मा.जिल्हाधिकारी महोदय यांच्या मान्यतेने

1) **जलयुक्त शिवार अभियान 2.0 :-** या योजने अंतर्गत ० ते १०० हे.अंतर्गत कॅम्पोजिट ग्याबियान बंधारे ची 138 कामे पूर्ण करण्यात आली

2) **आपत्ती सौम्मिकरन :-** या अंतर्गत जीवित व वित्त हानी होण्यापासून बचाव होईल अशा प्रकारच्या योजना जसे तलाव दुरुस्ती ,पूर संरक्षक भिंत इ.

3) **गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार अभियान :-** या योजने अंतर्गत अशासकीय संस्थेमार्फत तलावातील गाळ काढणे व नाला सरळीकरणाची कामे केली जातात.काढलेला गाळ शेतकऱ्यांच्या शेतात पसरविला जातो त्या साठी शेतकऱ्यांस अनुदान प्राप्त होत असते.

**या व्यतिरिक्त या विभागामार्फत खालील अभियान राबविल्या जाते.**

1) **जलशक्ती अभियान :-** या अंतर्गत विभागातील सर्व जलस्त्रोताचे स्थळासह नोंदणी केल्या जाते.
2) **आपत्ती व्यवस्थापन** :- या अंतर्गत विभागातील सर्व तलावांची पावसाळा पूर्व व पावसाळा नंतरची पाहणी करून धोका दायक तलाव शोधून त्यावर उपाय योजना केल्या जाते.पावसाळ्यात सर्व तलावांवर नियंत्रणासाठी अभियंत्यांच्या नेमणुका करून आपत्ती पासून बचाव होण्यासाठी नियंत्रण केल्या जाते.तसेच जिल्हा परिषदेचा आपत्ती व्यवस्थापनचा कक्ष या विभागात कार्यरत असतो.
3) **अमृत सरोवर** :- या अंतर्गत गावात तलावांची सरोवरांची निर्मिती/दुरुस्ती झालेली आहे अशा ठिकाणी राष्ट्रीय सणांच्या दिवशी ध्वजारोहन करून जलाची जनजागृती केल्या जाते.
4) **सिंचन प्रगणना** :- दर पाच वर्षांनी जिल्ह्यातील सर्व विभागाच्या जलस्त्रोताची गणना करून सिंचना संबंधीची माहिती जमा केल्या जाते.

दरवर्षी घेण्यात येणाऱ्या जलसंधारणाच्या कामामुळे आज रोजी जिल्ह्यामध्ये Tanker ची संख्या खूप कमी झालेली आढळून आली आहे.

**मत्स्यव्यवसाय**

लघुपाटबंधारे विभागांतर्गत 178 तलाव मत्स्यव्यवसायासाठी नोंदणीकृत संस्थेस ठेक्याने दिली आहेत.अंदाजे रु.4.5 ते 5.00 लक्ष एवढा वार्षिक महसूल जमा होतो.